दिनांक ०१/०६/२०२१

**प्रसिध्दी पत्रक**

**आरोपी लोकसेवक गणेश ज्ञानेश्वर अंतरप, पोह/२४९, नेमणुक एम.आय.डी.सी.वाळुज, औरंगाबाद शहर यांनी ६०,०००/- रु लाचेची स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आलोसे याचे नाव, हुद्दा | :- | गणेश ज्ञानेश्वर अंतरप, पोह/२४९, नेमणुक एम.आय.डी.सी.वाळुज, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.वाळुज, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर,पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ६०,०००/- रु स्विकृती |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे विरुध्दचे तक्रारी अर्जावर कारवाई न करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज च्या मेन गेटजवळ |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. वाळुज येथे दाखल असलेल्या तक्रारी अर्जावर कारवाई न करण्याकरीता तक्रारदार यांचेकडे पोलीस हवालदार अंतरप, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज हे १,५०,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, गणेश अंतरप, पोलीस हवालदार/ २४९, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे १,५०,०००/- रुपयाची मागणी करुन तडजोडीअंती ६०,०००/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद तर्फे आज रोजी सापळा आयोजीत केला असता, गणेश ज्ञानेश्वर अंतरप, पोलीस हवालदार /२४९, पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडुन ६०,०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी.वाळुज,औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा. डॉ. राहुल खाडे, प्रभारी अपर पोलीस अधीक्षक मा.श्री. मारुती पंडीत, पोलीस उपअधीक्षक बी.व्ही.गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी केली आहे. त्यांना पोना/गंगाधर भाताने, अशोक नागरगोजे, पो.अ.कपील गाडेकर, चालक अंमलदार चांगदेव बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

01/06/2021

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग**
**औरंगाबाद.**